नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/ आस्था-कापरिप/९५५१/२०१७
नाशिक दिनांक २१ / ११ /२०१७

# परिपत्रक

**विषय :- दर सोमवारी मुख्यालय न सोडणे बाबत.**
**संदर्भ :- मा.ना.अध्यक्षा, जि.प.नाशिक यांनी दिलेल्या सुचना**

शासन आदेशानुसार आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामकाज करणे अनिवार्य आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, जि.प.अधिनस्त खाते प्रमुख हे गट विकास अधिकाऱ्यांना जि.प.मुख्यालयात बैठकीसाठी बोलवत असतात त्यामुळे गट विकास अधिकारी यांनाही गट स्तरावर विकास कामांकडे लक्ष देणेस पुरेसा वेळ मिळत नाही. ग्रामपंचायत स्तरावरील सरपंच/सदस्य/ग्रामस्थ हे विकास कामांबाबत समस्या माडण्यांसाठी गट स्तरावर येत असतात. गट विकास अधिकारी हे गट स्तरावर नसल्यामुळे त्याचा विपरित परिणाम विकास कामांवर होतो. या बाबत ग्रामस्थांच्या वारवांर तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तरी याद्वारे कळविण्यात येते की, यापुढे खाते प्रमुखांनी **दर सोमवारी** कोणत्याही आढावा बैठका आयोजित करू नये. तसेच विषय समित्यांच्या बैठकाही आयोजित करू नये. गट स्तरावरही गट विकास अधिकारी यांनी दर सोमवारी त्यांचे अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या बैठका आयोजित करू नये.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

(शितल सांगळे)
अध्यक्षा
जिल्हा परिषद नाशिक

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.**
१.मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
२.मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक.
३.मा.सभापती, विषय समिती-----------, जिल्हा परिषद, नाशिक.
प्रत :- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
२.खाते प्रमुख (सर्व)----------------, जिल्हा परिषद, नाशिक.
३.गट विकास अधिकारी, पंचायत समिती--------------(सर्व)
IT Cell...

Scanned by CamScanner